# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र





०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


**जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ४७१ /२०१८ पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा दिनांक ०१/०९/२०१८**

## " सट्टापट्टीवर जुगार खेळ खेळविणारे आरोपींना पकडुन मुद्देमाल केला जप्त"

**पोलीस स्टेशन भंडारा:–** भंडारा शहरात बडा बाजार, फुले वार्ड येथे सार्वजनिक ठिकाणी पथ दिव्याचे प्रकाशात वरली मटक्यावर लोकांकडुन पैसे घेवुन आकडे लिहुन हार जितचा जुगार खेळ खेळवित असल्याचे माहितीवरून भंडारा शहरात वेगवेगळया ठिकाणी तिन ईसमांवर छापाघालुन त्यांचे पासुन जुगार खेळ खेळविण्याचे साहीत्य मिळुन आल्याने त्यांचेवर पोलीस ठाणे भंडारा येथे गुन्हे नोंदवुन कार्यवाही करण्यात आली.

बडा बाजार येथे वरली मटक्यावर राजधाणी, कुबेर नावाने लोकांकडुन पैसे घेवुन आकडयावर हार जितचा जुगार खेळ खेळवित असल्याचे गुप्त माहिती वरून सट्टापट्टी खायवाल गंगाधर वरकडे रा. महालवार्ड भंडारा याचे सांगण्यावरून सट्टापट्टीवर आकडे लिहणारा निलकंठ गोपाळराव हर्षे, वय ५८ वर्ष, रा. गांधी वार्ड वरठी ता. मोहाडी याचेवर छापा टाकुन त्याचे पासुन वरली मटक्याचे आकडे लिहलेली सट्टापट्टी, नगदी रक्कम असा एकुण ११४५ रूपयाचा माल मिळुन आल्याने पो.स्टे. भंडारा येथे अपराध क्र. ६८८/१८ कलम १२(अ) महा जुगार कायदा सह कलम १०९ भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

महात्मा फुलेवार्ड, गजानन मंदिर जवळ भंडारा येथे वरली मटक्यावर राजधाणी, कुबेर नावाने लोकांकडुन पैसे घेवुन आकडयावर हार जितचा जुगार खेळ खेळवित असल्याचे गुप्त माहिती वरून सट्टापट्टी खायवाल गंगाधर वरकडे रा. महालवार्ड भंडारा याचे सांगण्यावरून सट्टापट्टीवर आकडे लिहणारा राहुल मोतीलाल पारीसे, वय ३२ वर्ष, रा. अंसारीवार्ड भंडारा याचेवर छापा टाकुन त्याचे पासुन वरली मटक्याचे आकडे लिहलेली सट्टापट्टी, नगदी रक्कम असा एकुण १३,८८५ रूपयाचा माल मिळुन आल्याने पो.स्टे. भंडारा येथे अपराध क्र. ६८९/१८ कलम १२(अ) महा जुगार कायदा सह कलम १०९ भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

महात्मा फुलेवार्ड, गजानन मंदिर जवळ भंडारा येथे वरली मटक्यावर राजधाणी, कुबेर नावाने लोकांकडुन पैसे घेवुन आकडयावर हार जितचा जुगार खेळ खेळवित असल्याचे गुप्त माहिती वरून सट्टापट्टी खायवाल रमेश हेडाउ रा. सागर तलाव, हनुमान मंदिर जवळ भंडारा याचे सांगण्यावरून सट्टापट्टीवर आकडे लिहणारा भुषन भाउराव टेकाम, वय २८ वर्ष, रा. टिळकवार्ड भंडारा याचेवर छापा टाकुन त्याचे पासुन वरली मटक्याचे आकडे लिहलेली सट्टापट्टी, नगदी रक्कम असा एकुण १९१० रूपयाचा माल मिळुन आल्याने पो.स्टे. भंडारा येथे अपराध क्र. ६८७/१८ कलम १२(अ) महा जुगार कायदा सह कलम १०९ भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक भंडारा, विनीता साहू यांचे मार्गदर्शनात जिल्हा रेड पथक प्रमुख पोलीस उप निरीक्षक जितेन्द्र के. आडोळे, स.फौ. अश्विनकुमार मेहर, पोलीस हवालदार रुपचंद जांगळे, पोलीस नाईक प्रदीप डहारे, विनोद शिवणकर यांनी कार्यवाही केली आहे.

**(जितेंद्र के आडोळे)**
**पोलीस उपनिरीक्षक**
**जनसंपर्क अधिकारी**
**संपर्क क्र. ९४०३१०९७२०**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.